FORM-1A N.C.R.B.

I.I.F.-I

पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154186

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे ला.प्र.वि., पहिली खबर क्र. २० , वर्ष २०२२, दिनांक २०/०४/२२
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act म. प्र. अधि. १९८८, कलमे Sections ७
(ii) अधिनियम Act ......, कलमे Sections ......
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ......

3. (a) अपराधाची घटना : वार ......, तारीख पासून १९/०४/२२, वेळ १४.३०, तारीख पर्यंत २८/०४/२२ वेळ २२.४४ वा.
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख २८/०४/२०२२, वेळ ......
Information received at P. S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ......, तारीख २०/०४/२२ वेळ ......
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : ......, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा १३ कि., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ......
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव लोकम सोसायटी ठोंट समोरील रस्त्यावर ठिकाणाचे नंबर ...... गल्ली ......, रस्त्याचे नाव ......
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण देवनार, गाव मुं. ४३, पोस्ट ......, तालुका ......, जिल्हा ......, राज्य ......
Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ......, तालुका ......, जिल्हा ......, राज्य ......
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name शरीना खान (b) वडिलांचे / पतीचे नाव मोहमद अख्तार खान
Father's / Husband's Name
(c) जन्म तारीख व वय ३८ वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ९६९९५३२२७७
Date of Birth and Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक —, दिल्याचा दिनांक —, दिल्याचे ठिकाण ...... (f) व्यवसाय गृहीणी
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion मुस्लिम, जात Caste ......, जनजात Sub-Caste ......
(h) पत्ता ......, गल्ली / सर्व्हे नं. ...... घर / नाव नं. ...... फोन / मो. नं. ...... पॅन नं. ...... वोटर्स नं. ......
Address Ward House/Name No. Phone/Mo. No. PAN No. Card No.
रस्त्याचे नाव रुम नं ६६४, डॉ. आंबेडकर नगर, जुनी मस्जिदच्या मागे, जवळचे प्रसिद्ध ठिकाण ......, गाव ......, पोस्ट ......, पो. स्टे. ......
Road घाटकोपर मानखुर्द लिंक रोड, Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका गोवंडी, जिल्हा मुंबई ४३, राज्य ......, सध्याचा पत्ता ......
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)
हरिभाऊ केरूजी कानकर, वय ५४, धंदा - नोकरी - पोलीस निरीक्षक,
रा. ठि. C/44, N5, महात्मा गांधी कॉम्प्लेक्स, सेक्टर १४,
वाशी, नवी मुंबई - ४००७०३

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K) 829

Scanned with OKEN Scanner

यातील फिर्यादी श्रीमती शरिना मोहमद अख्तर खान, वय ३८ वर्षे, यांचा स्वतंत्र कागदावर जबाब नोंद करण्यात आला असुन तिचे सदर गुन्ह्याची प्रथम खबर म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(गणेश पिंगुवाले)
पोलीस निरिक्षक
सायबर, मुंबई

Scanned with OKEN Scanner

फिर्याद दिनांक – २७/०५/२०२२.

मी जरीना मोहम्मद अख्तर खान, वय ३८ वर्षे, धंदा–गृहीणी व समाजसेविका, रा.ठी. रुम नं. ६९४, डॉ. झाकीर हुसेन नगर, नुरानी मस्जीदच्या मागे, घाटकोपर मानखुर्द लिंक रोड, गोवंडी, मुंबई–४०००४३ मो.क्र. ९६९९३३२२७१.

---

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर माझे कुटुंबियासमवेत गेल्या २५ वर्षापासुन रहात आहे. मी घरातील कामकाज संभाळुन समाजसेविकाचे काम करते. माझी के.जी.एन अल हुसेन असोसिएशन नांवाची संस्था असुन सदर संस्थेची मी अध्यक्षा आहे. सदर संस्था रजिस्टर्ड केलेली आहे. सदर संस्थेमार्फत मी राहत असलेल्या परिसरात राहणाऱ्या नागरीकांच्या मुलांना शाळामध्ये प्रवेश, तसेच महानगर पालिकातर्फे मिळालेले धान्य गरजु नागरिकांना वाटप करणे, तसेच परिसरातील गरजु रुग्णांना रुग्णालयात दाखल करण्याकरिता मदत करणे इत्यादी कामे मी करते.

माझे पती मोहम्मद अख्तर किताब उल्ला खान याचे मुस्कान कलेक्शन नावाचे कपडयाचे दुकान हवा मेन्शन, दुकान नं. ४६–बी, मिनारा मस्जिदची गल्ली, मेमान वाडा रोड, मुंबई नं. ४०० ००३ येथे आहे. सदर दुकानाचे कामकाज माझे पती करतात. सदर व्यवसायातुन मिळणाऱ्या उत्पन्नावर आमच्या कुटुंबाची उपजिवीका चालते.

दि. २१/०५/२०२२ रोजी देवनार पोलीस ठाणे येथे माझे पती मोहम्मद अख्तर किताब उल्ला खान यांच्यावर व माझी बहीण झिनत हिचा मुलगा इमरान कयुम कुरेशी यांचेवर गुन्हा नोंद क्र. ५७३/२०२२ कलम ३५४, ३२४, ५०४,५०६,३४ भा.द.वि.सं. अन्वये गुन्हा दाखल झाल्याचे माझे पतीला दि. २२/०५/२०२२ रोजी समजल्यावर देवनार पोलीस ठाण्याचे पी.आय.बानकर साहेबांना त्यांनी कॉल करुन विचारले असता बानकर साहबांनी माझे पती यांना व्हॉट्सॲप कॉल करण्यात सागितले. माझे पतीने त्यांना व्हॉट्सॲप कॉल केला असता बानकर साहेबांनी माझे पतीला सांगितले की, '' तुझे नांव गुन्हयातुन काढतो त्याकरीता मला रु. २५,०००/– दयावे लागतील.'' त्यानंतर पीआय बानकर यांनी माझे पतीला दिवसभरात दोन ते तीन वेळा कॉल करुन पैशांची मागणी केली. माझी मुलगी मुस्कान हीचे लग्न दि. २३/०५/२०२२ रोजी असल्याने मी त्यांना विनंती केली व माझे पती यांच्यावर मुलीच्या लग्नकार्यादरम्यान कारवाई होवु नये म्हणुन मी दिर मोहम्मद शरीफ यांच्याजवळ रु. २०००/– पाठवुन दिले होते. ते पी.आय बानकर साहेब यांनी घेतले.

पीआय बानकर साहेब हे आणखी पैसे मागत असल्याने परंतु मला लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि. २४/०५/२०२२ रोजी माझे नातेवाईक मीराज अन्सारी यांचेसोबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, वरळी, मुंबई येथे येवून पी.आय बानकर यांचेविरुध्द लेखी तक्रार दिली. परंतु दि. २३/०५/२०२२ रोजी माझ्या लग्न झालेल्या मुलीचे रिसेप्शनचा कार्यक्रम दि. २५/०५/२०२२ रोजी असल्याने मी पुढील कारवाई दि. २६/०५/२०२२ रोजी करण्याबाबत पो.नि. पिंगुवाले साहेबांना विनंती केली त्यामुळे मी पी.आय. बानकर यांचे विरुध्द पडताळणी/सापळा कारवाई करीता दि. २४/०५/२०२२ व २५/०५/२०२२ रोजी जाता आले नाही. व दि. २६/०५/२०२२ रोजी मी पडताळणी/सापळा कारवाई करीता येते असे सांगितले.

मी विनंती केल्याप्रमाणे दि. २६/०५/२०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता माझे नातवाईक मिराज यांचेसह लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी, मुंबई येथे पो.नि. पिंगुवाले यांचे दालनात हजर झाले. त्यांचे समक्ष आणखी एक इसम बसले होते त्यांची ओळख मला पो. नि. कोरडे अशी करुन देवून ते पडताळणी/सापळा कारवाईमध्ये पर्यवेक्षक अधिकारी म्हणुन कामकाज करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पो.नि. पिंगुवाले यांनी पथकात सहभाग घेणाऱ्या पोलीसांना त्यांचे दालनात बोलावुन त्यांची ओळख करुन दिली. तसेच दोन सरकारी पंच यांना बोलावुन त्यांची ओळख अनुक्रमे विलास राजाराम गायकवाड व सुनिल बळिराम नार्वेकर यांची

Scanned with OKEN Scanner

ओळख करून दिली. सदर कारवाईदरम्यान ते पंचाचे काम करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर दोन्ही पंचाना पो. नि. पिंगुवाले यांनी दिनांक २४/०५/२०२२ रोजी तक्रारदार यांनी त्यांच्या स्वहस्ताक्षरात लिहीलेला तक्रारअर्ज दाखविला व सदरचा अर्ज पो नि पिंगुवाले यांनी पुढील कारवाईकरिता स्वत:कडे ठेवुन घेतला. त्यानंतर पंच व मला व स्वत: गोपनीय कक्षात घेवुन गेले व तेथे माझे तसेच पो नि पिंगुवाले व दोन पंच यांचे व्यक्तव्य एका डीव्हीआर मध्ये ध्वनीमुद्रीत केले.

त्यानंतर पो.नि. पिंगुवाले, पो.नि. कोरडे, दोन सरकारी पंच तसेच सापळा कारवाईत सहभाग घेणारे पोलीस अंमलदार असे पथक असे लाप्रवि कार्यालयाचे आवारात उभ्या असलेल्या दोन सरकारी वाहनाजवळ आले व एका वाहनात पो.नि. पिंगुवाले, पो नि कोरडे, सरकारी पंच गायकवाड, मपोशि बाबर, पो शि परब, पो शि यादव, व दुसऱ्या वाहनात इतर पोलीस पथकातील अंमलदार व पंच नार्वेकर असे बसुन शताब्दी हॉस्पिटल, चेंबुरच्या जवळ थोडया अंतरावर थांबविल्या. त्यानंतर पो नि पिंगुवाले यांनी पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यान माझे सलवारच्या आतील बाजुस सेप्टी पिनच्या साहायाने डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर लावण्यात येणार असुन होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सागितले. त्यावेळी पो. नि. पिंगुवाले यांनी पडताळणीदरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत माहिती समजावुन सांगितली.

त्यादरम्यान मी सांगितल्याप्रमाणे माझे परिचयातील इसम नामे मिराज अन्सारी याने लोकसेवक हे रात्रपाळी कर्तव्य केले असल्याने ते डयुटीवर नसल्याचे सांगितल्याने सदरची पडताळणी कारवाई ही लोकसेवकाशी संपर्क झाल्यानंतर करावयाचे ठरविण्यात आले. त्यानंतर मी पो नि पिंगुवाले यांना विनंती केल्यावरून मला घरी जाण्यास सांगुन पीआय बानकर यांनी संपर्क साधल्यानंतर तात्काळ कळविण्यास सांगितले. त्यानंतर पंच व पोलीस पथक लाप्रवि कार्यालयात परत गेले.

पो.नि. बानकर यांनी संध्याकाळी माझे पती यांचे मोबाईलवर संपर्क साधुन संध्याकाळी ०८.०० वा. ते पोलीस ठाणेस येणार असल्याचे सांगुन फोन करण्यास सांगितले. असे मी पो नि कोरडे यांना फोन करून सांगितले. त्यावर पो नि कोरडे यांनी मला सायंकाळी ०८:०० वाजता शताब्दी हॉस्पिटल येथे येण्यास सांगुन ते देखील पोलीस पथक व पंचासह येणार असल्याचे सांगितले. पो नि कोरडे यांनी सांगितल्याप्रमाणे सायंकाळी ०८:२० वाजेच्या दरम्यान मी माझे पती यांचेसह शताब्दी हॉस्पिटलच्या समोर पोहचले असता त्याठिकाणी पोलीस पथक व पंच सरकारी दोन वाहनासह तेथे हजर होते. मी पो.नि. पिंगुवाले व पो.नि. कोरडे ज्या वाहनामध्ये बसले होते तेथे गेलो तेव्हा माझे पती यांनी पो.नि. कोरडे यांना सांगितले की, " पी.आय. बानकर साब ने फोन करके बोला है की सुन्नी कब्रस्थान के पास आ जाओ " त्याप्रमाणे पो.नि. पिंगुवाले यांनी मला वाहनात बसवुन पडताळणी कारवाई बाबत मला व पंच यांना सुचना दिल्या व त्यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन पथकातील महीला पोलीस अंमलदार बाबर यांचे करवी माझ्या सलवारच्या आतील बाजुस कापडी पिशवीमध्ये सेप्टी पिनच्या साहायाने लावला. त्यानंतर पो.नि. पिंगुवाले यांचे सुचनेप्रमाणे मी, माझे पती व पंच गायकवाड असे अॅटो रिक्षाने सुन्नी कब्रस्थानच्या दिशेने गेलो. तेथे गेल्यानंतर पी.आय. बानकर हे एका सफेद रंगाच्या

समक्ष,

( गणेश पिंगुवाले ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

( झरीना मोहम्मद अख्तर खान)

Scanned with OKEN Scanner

कारमध्ये बसले होते तेथे गेल्यानंतर पी.आय बानकर व माझेमध्ये गुन्हया संदर्भात बोलणे होवुन पी.आय बानकर यांनी माझेकडे माझ्या पतीला त्यांच्या विरुध्द दाखल असलेल्या केसमध्ये मदत करण्याकरीता व गुन्हयातील नाव कमी करण्याकरीता पुन्हा रु. २५,०००/— ची मागणी केली. त्याचदरम्यान पीआय बानकर यांनी पंच यांना ते कोण आहेत असे विचारुन त्यांना बाजुला थांबण्यास सांगितले. व त्यानंतर बोलणे करून तडजोडी अंती रु. १५,०००/— देण्याचे ठरले त्यावेळी मी यापुर्वी तुम्हाला रु.२०००/— दिले आहेत असे सांगितले असता त्यांनी मान्य करुन उर्वरित रु. १३,०००/— देण्याबाबत सांगितले व माझे पती यांना तेथेच थांबवुन ठेवुन मला पैसे अर्धा तासामध्ये घेवून येण्याबाबत सांगितले. त्याप्रमाणे मी व पंच गायकवाड तेथुन निघुन सापळा कारवाई पथक वाहन थांबले होते तेथे निघुन आलो. त्यानंतर माझेकडील व्हॉईस रेकॉर्डर म.पो. शि. बाबर यांनी काढला व पो.नि. पिंगुवाले यांनी त्यांच्या ताब्यात घेवुन तो बंद केला. त्यावेळी मी माझे व पी.आय बानकर यांचेमध्ये झालेले संभाषणाची हकीगत सांगितली. त्यानंतर पो.नि. पिंगुवाले यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन पंचांना ऐकवला असता त्यामध्ये माझे व लोकसेवक बानकर यांचेमध्ये झालेल्या संभाषणात पी.आय. बानकर यांनी माझे पतीला दाखल असलेले केसमध्ये मदत करण्याकरीता व गुन्हयातील नांव कमी करण्याकरीता माझ्याकडे रु. २५,०००/— लाचेची रक्कमेची मागणी करुन तडजोडी अंती रु. १३,०००/— मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

यानंतर पो.नि. पिंगुवाले यांनी मला, पोलीस पथक व दोन पंचाना सापळापुर्व व सापळा कारवाईची माहिती समजावुन सांगितली. त्यानंतर मी माझ्या बचतीतून आणलेली लाचेची रक्कम रु. ५,०००/— ( भारतीय चलनाच्या रु. ५००/— दराच्या एकुण १० नोटा) पो.नि. पिंगुवाले यांचेकडे सुपुर्द केली. व उर्वरीत रक्कम रू ८,०००/— माझेकडे नसल्याचे मी सांगितले तेव्हा पो.नि. पिंगुवाले यांनी त्यांचेसोबत आणलेल्या खेळण्यातील नोटा वापरण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांच्याकडील खेळण्यातील नकली नोटा रू ५००/— दराच्या एकुण १६ नोटा असे एकुण १३,०००/— वापरण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पो.नि. पिंगुवाले यांनी मला व दोन पंचांना अ‍ॅन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म सागितले व त्यांचे सुचनेनुसार पथकातील वाहन चालक श्री. चिंचोळकर यांनी नोटांना अ‍ॅन्थ्रासिन पावडर लावली. व ती रक्कम मपोशि बाबर यांनी अलगद माझे कमीजच्या उजव्या खिशात ठेवली. तसेच श्री चिंचोळकर हे सापळा कारवाईत सहभाग घेणार नसल्याचे सांगितले. त्यांनतर पो.नि. पिंगुवाले यांनी डीजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन म.पो.शि बाबर यांचेकडे दिला तो व्हॉईस रेकॉर्डर बाबर यांनी माझे सलवारच्या आतील बाजुस कापडी छोटया पिशवीमध्ये सेप्टी पिनच्या सहाय्याने अडकविला. त्यानंतर पो.नि. पिंगुवाले यांचे सुचनेनुसार मी व पंच गायकवाड असे रिक्षाने सुन्नी कब्रस्थानच्या दिशेने निघालो पाठोपाठ पथकातील अधिकारी व अंमलदार असे कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने आमचे पासुन काही अंतर ठेवुन रिक्षाने येवुन सुन्नी कब्रस्थानच्या आजुबाजुला येवून थांबले.

त्यानंतर मी पी.आय बानकर हे त्यांचे पांढऱ्या रंगाच्या गाडीमध्ये ड्रायव्हर सिटवर बसले होते तेथे जावुन त्यांना ठरल्याप्रमाणे लाचेची रक्कम रु. १३,०००/— आणली असल्याचे सागुन त्यांचेसमोर धरली असता त्यांनी ती उजव्या हाताने घेवून गाडीच्या डाव्या सिटवर ठेवली. त्यानंतर मी ठरल्याप्रमाणे माझ्या डोक्यावर असलेल्या ओढणीवर हात फिरवुन सापळा पथकास

समक्ष,

( गणेश पिंगुवाले ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

( झरीना मोहम्मद अख्तर खान)

Scanned with OKEN Scanner

पुर्वनियोजित इशारा केला तेवढयात पीआय बानकर यांनी त्यांचे ताब्यातील मोटारवाहन युटर्न घेत असताना सापळा पथकातील अधिकारी व अंमलदारांनी तात्काळ पीआय बानकर यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेतले.

पीआय बानकर यांनी माझे पती यांच्याविरोधात नोंद गुन्हयात मदत करण्याकरिता तसेच गुन्हयातील माझे पती यांचे नाव काढुन टाकण्याकरिता रू २५,०००/— मागणी करून तडजोडीअंती १५,०००/— रू स्विकारण्याचे मान्य करून त्यापैकी २,०००/— हे यापुर्वीच घेतल्याचे कबुल करून रू १३,०००/— लाचेची रक्कम माझेकडुन स्विकारली म्हणुन माझी पीआय बानकर याचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझे पीआय बानकर यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून ती मला मराठीत वाचुन हिंदीत समजावुन सांगितली असता ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( गणेश पिंगुवाले ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

( जरीना मोहम्मद अख्तर खान )

Scanned with OKEN Scanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..........

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page

..........

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद ना. वे. व. हि. फिर्यादी यांच्या पती विरुद्ध दाखल गुन्ह्यात अटक आरोपीत लोकसेवकाने फिर्यादी यांच्या पतीचे नाव गुन्ह्यात कमी करणे तसेच गुन्ह्यात मदत करण्याकरिता रु. २५०००/- इतक्या लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु. १५,०००/- स्विकारण्याचे मान्य करुन रु. २०००/- हे यापुर्वीच घेतल्याचे कबूल करुन रु. १३,०००/- इतक्या लाचेची रक्कम परिश्रमाखेरीज स्वतःच्या फायद्यासाठी स्विकारली म्हणून गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरुन कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करुन तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

..........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन.........., जिल्हा.........., राज्य..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.).......... Rank.......... No.......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.......... (3) Transferred to P. S. .......... District.......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name बाळासो पिंगवाले
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ला.प्र.वि. मु.
Posting
Code No. of I. O. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख..........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**